ग्राहक गा-हाणे निवारण मंच
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172

No,CGRF/AZ/ U / 223 / 2009 /57 Date :-

*To,*
*The Executive Engineer ( Administration)*
*O/O Superintending Engineer ,*
*O&M Urban Circle , M.S.E.D.C.L.,*
*Aurangabad.*

*Sub:- Forwarding of grievance in respect Shri Bhasker Gopinath Bansode, Plot No.75, New Balajinagar, ,Shivajinagar, Garkheda, Aurangabad. (Consumer no. 490012415874)*

Dear Sir,

*Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Forwarding of grievance in respect of Shri Bhasker Gopinath Bansode, Plot No.75,New Balajinagar, ,Shivajinagar, Garkheda, Aurangabad.*

*You are requested to submit your para wise reply on the grievance at the time of hearing. The hearing in the matter will be held on 30.06.2009 at 12= 00 Hrs.*

Encl: As above

Member/Secretary
CGRF(AZ) MSEDCL
Aurangabad.

Copy to:-
*Shri Bhasker Gopinath Bansode*
*Plot No.75, New Balajinagar, ,*
*Shivajinagar, Garkheda,*
*Aurangabad.*

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/२२३/२००९/५७**

**तक्रार दाखल दिनांक :- १६/०६/२००९**
**निकाल दिनांक :- ०३/०७/२००९**

**श्री भास्कर गोपीनाथ बनसोडे,**
**प्लॉट नंबर ७५,न्यु बालाजीनगर,**
**शिवाजीनगर,गारखेडा,**
**औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००१२४१५८७४) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**
**शहर विभाग औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **एच. आर. शाह** | **सदस्य/सचिव** |

**आदेश**

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक १६/०६/२००९ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक ३०/०६/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदार यांनी महावितरण कंपनीकडुन घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला असुन त्यांना मार्च २००९ मध्ये मीटर वरील रिडींगची नोंद न घेता अंदाजे वाढीव बिल देण्यात आले.या बिलाबाबत त्यांनी महावितरणच्या संबंधित विभागाकडे तक्रार दाखल केली पण त्यांच्या तक्रारीची दखल घेण्यात न आल्यामुळे त्यांनी मंचात ही तक्रार दाखल केली असुन महावितरण कंपनीस सुधारीत वीज बिल देण्याबाबत आदेश देण्याची विनंती मंचास केली आहे.

२) दिनांक ३०/०६/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार श्री भास्कर बनकर उपस्थित होते. महावितरण तर्फे नोडल अधिकारी म्हणुन श्री जी.एस.राठौर उपस्थित होते. त्यांनी अर्जदाराच्या तक्रारीवर आपला जवाब मंचात दाखल केला व अर्जदारास चुकीचे वीज बिल आकारण्यात आले असल्याचे मान्य केले. अर्जदाराचे वीज बिल दुरुस्त करुन त्यांना ३२२९=६२/-रुपये रक्कम क्रेडीट देण्याची तयारी त्यांनी दर्शविली. मंचाने दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकल्यानंतर प्रकरण निकालासाठी ठेवले.

३) अर्जदार व महावितरणचे नोडल अधिकारी यांनी मंचात दाखल केलेल्या कागदपत्रावरुन असे आढळुन येते की, महावितरण कंपनी तर्फे फेब्रुवारी २००९ मध्ये चालु रिडींग १६० दाखवत ५४ युनीट वीज वापराचे बिल आकारण्यात आले. मार्च २००९ मध्ये मागील रिडींग

१६८ व चालु रिडींग ८२६ दाखवत ६५८ युनीट वीज वापराचे बिल आकारण्यात आले. अर्जदारास देण्यात आलेल्या वीज बिलातील फोटोमध्ये ४६३ रिडींग स्पष्टपणे दिसत असतांना ८२६ अशी चुकीची रिडींग दाखविण्यात आल्याचे दिसुन येते. नोडल अधिकारी यांनी फोटो रिडींग घेण्यासाठी मे.युनीव्हर्सल ट्रान्सफार्मर या एजन्सीची नेमनुक केली असुन त्यांच्या चुकीमुळे अर्जदारास वाढीव रकमेचे बिल देण्यात आल्याचे म्हटले आहे. नोडल अधिकारी यांनी वीज बिलात दुरुस्ती करुन अर्जदारास ३२२९=६२/- रुपये रक्कम क्रेडीट देण्याचा प्रस्ताव मंचात दाखल केला आहे जो योग्य असल्याचे मंचाचे मत आहे.

वरील सर्व बाबीचे निरिक्षण केल्यावर अर्जदाराने मंचात दाखल केलेली तक्रार मान्य करण्यात येते. व अर्जदारास झालेल्या मानसीक त्रासापोटी ते नुकसान भरपाई मिळण्यास पात्र असल्याचे मंचाचे मत आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीने अर्जदारास ३२२९=६२/- रुपयाचे क्रेडीट देवुन ३० दिवसात सुधारीत वीज बिल द्यावे व या सुधारीत वीज बिलात कोणतेही व्याज व दंड आकारु नये.

२) महावितरण कंपनीने अर्जदारास रुपये २५०/- नुकसान भरपाई द्यावी.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **एच. आर. शाह** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/२२३/२००९/५७** **दिनांक :-**

**प्रति,**

**श्री भास्कर गोपीनाथ बनसोडे,**
**प्लॉट नंबर ७५,न्यु बालाजीनगर,**
**शिवाजीनगर,गारखेडा,**
**औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००१२४१५८७४)**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/२२३/२००९/५७ )

आपण दिनांक १६/०६/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**प्रती, सविनय सादर,**
**मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,**
**म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.**

**प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद**
**माहिती व उचीत कारवाही करीता**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**